महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईतील रुग्णालयाच्या परिसरात शांतता क्षेत्रासाठी असलेल्या सर्व नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

(१) १८२२ (२२-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रुग्णालयाचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून जाहीर केलेला असताना मोटारीचे हॉर्न व फेरीवाल्यांच्या आवाजामुळे या शांतता क्षेत्रासाठी असलेल्या सर्व नियमांचे उल्लंघन होताना दिसत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव रुग्णांना त्रास होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०६-०९-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) मुंबईतील रुग्णालयाचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले आहे.शांतता क्षेत्र म्हणून जाहीर केलेल्या परिसरात तसेच इतर ठिकाणी वायुवेग पथकामार्फत ध्वनी प्रदुषण करणाऱ्या वाहनांवर केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम ११९ मधील तरतूदीनुसार नियमितपणे कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी हंगाम २०१४-१५ अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांची नुकसान भरपाई रक्कम देण्याबाबत

(२) २९२१८ (१३-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रब्बी सन २०१४ हंगामात पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना विम्यापोटी नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पिक विमा महाराष्ट्र राज्यात किती मंजूर झाला,
(३) असल्यास, विम्याच्या हप्त्यापोटीच्या रकमेत महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाचा वाटा किती होता तो Agriculture Insurance Company ला कधी उपलब्ध करून देण्यात आला,
(४) असल्यास, सदर विम्याची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात केंव्हापर्यंत उपलब्ध होईल,
(५) नसल्यास, सदर विम्याची रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (२२-०६-२०१७) :(१) होय.
(२) राष्ट्रीय कृषि विमा योजना रब्बी हंगाम २०१४-१५ अंतर्गत राज्यातील ११.१६ लाख शेतकरी रु. २०.८२ कोटी विमा हप्ता भरून योनेत सहभागी झाले होते, त्यापैकी ६.८४ लाख शेतकऱ्यांना रु. २१०.९३ कोटी नुसार भरपाई कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली आहे.
(३) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१४-१५ मध्ये रु. २०.८२ कोटी विमा हप्ता जमा झाला होता. त्यामध्ये राज्य शासन हिस्सा रु. १.१२ कोटी व केंद्र हिस्सा रु. ६५.७३ लाख असा होता. राज्य हिस्सा अनुदानाची रक्कम ऑक्टोबर, २०१५ मध्ये भारतीय कृषि विमा कंपनीस अदा करण्यात आली होती.
(४) भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत रब्बी २०१४-१५ ची नुकसान भरपाई रक्कम रु.२१०.९३ कोटी जानेवारी व फेब्रुवारी, २०१६ दरम्यान संबंधित बँकांना अदा करण्यात आली होती व संबंधित बँकामार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे.
(५) विम्याची रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

माथेरान (जि.रायगड) येथील विद्यार्थ्यांना वाहनांअभावी होणारा त्रास

(३) ३३५१९ (१८-०१-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माथेरान (जि.रायगड) येथील शाळा दूरवर असल्याने तसेच वाहनांअभावी विद्यार्थ्यांना विशेषत: अपंग विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागते त्याचा अभ्यासावर परिणाम होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांना परवानगी देवून त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०७-०८-२०१७) :(१) ते (३) माथेरान नियमावली, १९५९ व केंद्रिय पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या केंद्रिय पर्यावरण व वन विभागाच्या दि. ०४.०२.२००३ च्या अधिसूचनेप्रमाणे माथेरान पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून त्यातील नियमावलीनुसार माथेरान म्युनिसिपल परिषदेच्या हद्दीत सर्व प्रकारच्या वाहनांना (ॲम्ब्युलन्स व फायर फायटर वगळून) वाहतूक बंदी करण्यात आली आहे.
(४) सदर बाब शासनाच्या कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विनापरवाना वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांवर कारवाई करण्याबाबत

(४) ४२७१४ (२८-०४-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य रस्ते वाहतूक मंडळाला रोजचा सुमारे २० कोटीचा तोटा सहन करावा लागत आहे, एसटी बस स्टँडजवळ खाजगी बस किंवा गाडया उभ्या असतात या गाडयामधून प्रवासी वाहतूक करातात त्यामुळे खाजगी वाहतूकीवर नियंत्रण आणायला सरकारचे प्रयत्न अपुरे पडत असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २००१ साली मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने विनापरवाना वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांवर कारवाई करण्याचे आदेश दिले असूनही प्रवासी वाहतूकीचे योग्य परवाने नाहित अशा गाडयांविरोधात जिल्हा प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई का केली नाही याबद्दलही चौकशीचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर २०१२ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०९-०८-२०१७) :(१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २००१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार परिवहन विभाग, पोलीस विभाग, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे संयुक्तरित्या महसुल सुरक्षा पथक स्थापन करुन अवैध प्रवासी वाहतूक करणा-या वाहनांविरुध्द नियमित कारवाई करण्यात येते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने दि. १४/०१/२०१६ रोजीच्या परिपत्रकाव्दारे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी म्हणून सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.१६/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व परिवहन कार्यालयांना अवैध प्रवासी वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता निर्देश दिले आहेत.

दिनांक १.४.२०१५ ते ३१मार्च २०१६ पर्यंत एकूण १,६८,८०२ वाहनांची तपासणी करुन एकूण रू.८९६.५५ लक्ष एवढा कर व दंड वसुल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याची केलेली मागणी

(५) ४५३८७ (२८-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याची मागणी मा. परिवहन मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) : (१) व (२) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी अपर परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मद्‌यपान करुन मोटार वाहन चालविणाऱ्यांचा मोटार वाहन परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याबाबत

(६) ५२२१९ (२८-०४-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मद्‌यपान करुन मोटार वाहन चालविणाऱ्यांचा मोटार वाहन परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याचा निर्णय शसनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मद्‌य पिऊन मोटार वाहन चालवून निरपराध पादचाऱ्यांचे जीव घेण्याच्या व गंभीर दुखापत होण्याच्या घटनांमध्ये फार मोठी वाढ झल्याने शासनाने मोटार वाहन अधिनियमात तातडीने सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मद्य पिऊन मोटार वाहन चालविणाऱ्या चालकांची रस्त्यांवर तपासणी करण्यासाठी वाहतूक पोलीसांकडे दारुच्या नशेत असल्याचा पुरावा मिळावा म्हणून यंत्रसामुग्री अत्यंत अपुरी असल्याने ती वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०६-०९-२०१७) : (१) व (२) मोटार वाहन अधिनियम,१९८८ च्या कलम १९ व केंद्रिय मोटार वाहन नियम,१९८९ च्या नियम २१ नुसार दारु पिऊन/अंमली पदार्थांचे सेवन करुन वाहन चालविल्यास वाहन चालकाची अनुज्ञप्ती किमान तीन महिने इतक्या कालावधीसाठी निलंबित करावी असे परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.०१.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकाव्दारे सर्व कार्यालय प्रमुखांना सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

(३) राज्य पोलीस दलांसाठी ११५२ नग आणि पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाकरीता १५२ नग ब्रेथ ॲनालायझर असे एकूण १३०४ उपकरण संच खरेदीस गृह विभागाच्या दि. १४.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कडून १५२ ब्रेथ ॲनालायझर (श्वास विश्लेषक यंत्र) मशिन वाहतूक पोलीस चौक्यांना वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच महामार्ग सुरक्षा पथकाकडे ७३ ब्रेथ ॲनालायझर उपलब्ध असून इतर पोलीस घटकांना पोलीस महासंचालक कार्यालयाकडून आवश्यकतेप्रमाणे ब्रेथ ॲनालायझर उपलब्ध करून देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत.

(७) ५४२८५ (२४-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरसह पाच जिल्हयातील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची १०० पदे भरले असतांना विदर्भातील पाच जिल्हयातील उपप्रोदशिक परिवहन अधिकाऱ्यांची पदे अनावश्यक कारणांवरून रिक्त ठेवण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील अनेक लोकप्रतिनिधींनी सदर पदे भरणेकरीता लेखी विनंत्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशीकरुन उक्त पदे भरण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच उक्त रिक्त पदे भरणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) :(१), (२) व (३) विदर्भातील १३ उप प्रादेशिक परिवहन अधिका-यांपैकी केवळ ५ पदे रिक्त आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

काथरगांव (ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा) येथील टरबुजाच्या निकृष्ट बियाणांमुळे शेतक-यांचे झालेले नुकसान

(८) ५४९३७ (२०-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काथरगांव (ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांनी माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या सुमारास २२ एकर क्षेत्रात नामधारी ७५० टरबूज बियाणाची लागवड केलीअसून चार महिने उलटले तरी टरबुजांच्या वेलाला टरबूज लागले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही अंशी लागवड झालेल्या फळांचा दर्जा, फळांचे वजन व आकारमान यावर परिणाम झाला असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून होत असून या संदर्भात शेतकऱ्यांनी मंगळवार, दिनांक १९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास टरबूज रस्त्यावर फोडून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कंपनीकडून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०५-०८-२०१७) :(१) मे.नामधारी सीड्स कंपनीच्या एन एस ७५० या टरबुजाच्या वाणाची लागवड ११.६० हेक्टर क्षेत्रावर करण्यात आलेली होती. तथापि टरबुजांच्या वेलाला फळे लागली नाहीत, ज्या वेलाला फळे लागली ती आकाराने लहान होती, अशी बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीने प्रत्यक्ष मोका तपासणी करून फुलामध्ये पुरेशा प्रमाणात परागकण नसणे व फुलाची परागीकरण न होणे याकरीता सदोष बियाणे कारणीभूत असल्याचे निदर्शनास आणले आहे. या संदर्भात टरबूज बियाणे उत्पादक कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी रूपये १२,५००/- या प्रमाणे नुकसान भरपाई दिलेली असून शेतकऱ्यांनी तक्रारी मागे घेतलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील एसटी आगारांची पुनर्बांधणी व नुतनीकरणाबाबत

(९) ५६१६९ (२४-०८-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील एसटीची एकूण ५८८ बस स्थानके तर २५२ बस आबारांचे पुनर्बाधणी, नूतनीकरणांचा निर्णय एसटी महामंडळ करील असे आश्वासन मा.परिवहन मंत्री यांनी विधानमंडळ सभागृहात दिल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार राज्यातील एसटी आगारांचे पुनर्बांधणी व नुतनीकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२२-०८-२०१७) :(१) होय.

टप्प्या टप्प्याने २०० बसस्थानकांचे काम करण्याचे आश्वासीत करण्यात आले आहे.

(२) राज्यातील राज्य परिवहन महामंडळाची आगारे व बसस्थानके यांची टप्प्या-टप्प्याने पुनर्बांधणी, दर्जावाढ, नुतनीकरण सन २००९-१० पासून राज्य परिवहन महामंडळाच्या स्वनिधीतून व शासनाच्या सर्वसाधारण योजनेतून तसेच बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या माध्यमाद्वारे १०५ बसस्थानक/आगारांची कामे पूर्ण झाली असून, २१ ठिकाणची कामे प्रगतीपथावर आहेत. ५९ ठिकाणची कामे प्रस्तावित आहेत. उर्वरित बसस्थानके/आगारांची कामे आवश्यकतेनुसर व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर (जि.लातूर) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूरी करण्याबाबत

(१०) ५८६१६ (२४-०८-२०१६). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने महिन्यातील ३ दिवस शिबीराव्दारे गाड्यांचे पासिंग व वाहन चालविण्याचे मर्यादित परवाने वितरीत केले जाते व या शिबीरात देवणी शिरूर अनंतताळ, अहमदपूर, जळकोट, शिरूर ताजबंद येथील शेकडो वाहने व वाहन चालकांच्या माध्यमातून लाखो रूपयांचा महसूल उपलब्ध होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या निकशाप्रमाणे शिबीरात महसूल उपलब्ध होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उदगीर येथे उपप्रादेशिक कार्यालय मंजूर करण्यात यावे अशी मागणी माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उदगीर येथे उपप्रादेशिक कार्यालय मंजूर करण्याबाबत तसेच स्वतंत्र गाडी पांसिग नंबर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) :(१), (२) व (३) होय.
(४) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी उपर परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सुशिक्षित बेरोजगार व परप्रांतीयांना राज्यात व्यावसायिकदृष्ट्या कायमचे स्थायी होण्यासाठी किमान रिक्षा चालविण्याचा परवाना प्रत्यार्पित करण्याबाबत

(११) ५९४०८ (२४-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुशिक्षित बेरोजगार व परप्रांतीयांना राज्यात व्यावसायिकदृष्ट्या कायमचे स्थायी होण्याच्या दृष्टीकोनातून किमान रिक्षा चालविण्याचा परवाना प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी स्थानिक परप्रांतीय प्रवासी संघटना, लोकप्रतिनिधी तसेच सुशिक्षित बेरोजगार वाहतुकदार संघाच्या प्रतिनिधींनी मा.मंत्री (परिवहन), राज्यमंत्री (परिवहन), प्रधान सचिव (परिवहन) यांच्याकडे दिनांक १३ एप्रिल, २०१६ वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०९-०८-२०१७) : (१), (२) व (३) दि. १७.०६.२०१७ च्या अधिसूचनेव्दारे शासनाने टॅक्सी/रिक्षा परवान्यांवरील निर्बंध उठविलेले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये गोपीनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजनेला फारसा प्रतिसाद न मिळाल्याबाबत

(१२) ५९५४५ (२०-०८-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी सुरु केलेल्या गोपीनाथ मुंडे शेतकरी जनता अपघात विमा योजनेला अहमदनगर जिल्हयामध्ये फारसा प्रतिसाद न मिळाल्याने अवघे तीनच प्रस्ताव गेल्या सहा महिन्यात मंजूर झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीमा योजनेची माहिती सर्व सामान्य शेतकऱ्यांमध्ये पोहचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०८-२०१७) :(१) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१५-१६ अंतर्गत अहमदनगर जिल्हयात मे, २०१६ अखेर एकुण ५५ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करण्यात आले होते. त्यापैकी ४ प्रस्ताव विमा कंपनीकडून मंजूर करण्यात आले होते व १ प्रस्ताव योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्याने नामंजूर करण्यात आला होता. उर्वरीत ५० प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत होते.

तथापि, जून २०१७ अखेरच्या अहवालानुसार सन २०१५-१६ मधील अहमदनगर जिल्हयातील एकुण २७५ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करण्यात आले व त्यापैकी १८२ प्रस्ताव विमा कंपनीकडून मंजूर करण्यात आलेले आहेत. ५४ प्रस्ताव योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्याने विमा कंपनीकडून नामंजूर करण्यात आले असून उर्वरीत ३९ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.
(२) सदर योजनेबाबत शेतकऱ्यांना गाव, तालुका व जिल्हास्तरावरील शेतकरी प्रशिक्षण वर्ग, कृषि मेळावे, कृषि प्रदर्शने, सभा, बैठका इ. व्दारे, तसेच ग्रामस्तरावर प्रत्यक्ष भेटीव्दारे माहिती देण्यात आलेली आहे. तसेच, सदर योजनेस वर्तमानपत्र / घडीपत्रिका इ. व्दारे प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. विमा सल्लागार कंपनीमार्फत योजनेची प्रसिध्दीपत्रके तयार करुन कृषि विभागामार्फत वाटप करण्यात आलेली आहेत. माहे फेब्रुवारी/ मार्च २०१६ च्या सुवर्णमहोत्सवी शेतकरी विशेषांकामध्ये या योजनेची सविस्तर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेची माहिती व लाभ मिळण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी चिंचवड परिवहन कार्यालयातील चोरीला गेलेले आरसी बुक ब्लॅकने विकल्याबाबत

(१३) ५९७२१ (२४-०८-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील कोऱ्या वाहन नोंदणी (आर सी बुक) पुस्तिका चोरीला गेल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चोरीला गेलेली “आर. सी. बुक” एक हजार रुपयाला ब्लॅकने विकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जून, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान परमीटचे रजिस्टर चोरीला गेले याविषयी मोटर ड्रायव्हिंग स्कूल चालक श्री.रवींद्र कुदळे यांनी परिवहन आयुक्तांकडे लेखी तक्रार दिली परंतु श्री.कुदळे यांच्या तक्रार अर्जदेखील गहाळ झाल्याचे परिवहन कार्यालयाने सांगितले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) : (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) होय.

याबाबत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी निगडी पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. क्र.२४८/२०१६, दि. २०.४.२०१६ अन्वये २२४ कोरे नोंदणी प्रमाणपत्र चोरीला गेल्याची तक्रार दाखल केली आहे. तसेच कोरे नोंदणी प्रमाणपत्र व परमीट रजिस्टर चोरीला जाणे, याबाबत पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशनमार्फत चौकशी चालू आहे.

(५) सदर प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड यांनी निगडी पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर.क्र.३८१/२०१४, दि.१२.८.२०१४ अन्वये परमीट रजिस्टर चोरी गेल्याबाबत तक्रार दाखल केली आहे. पोलीस तपासामध्ये परमीट रजिस्टर आढळून आलेले असून ते सध्या निगडी पोलीस स्टेशन यांचे ताब्यात आहे. सदर परमिट रजिस्टर ताब्यात मिळण्यासाठी पिंपरी चिंचवड कार्यालयाने दि.२४.११.२०१६ रोजी मा. न्यायालयास अर्ज सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रिक्षा, टेंम्पोसह इतर वाहनांच्या परमिट नुतणीकरणाच्या रक्कमेत झालेली वाढ

(१४) ६१३९८ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रिक्षा, टेंम्पोसह इतर वाहनांच्या परमिट नुतणीकरणाच्या रक्कमेत दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ च्या अधिसुचनेद्वारे ५० ते १०० पट वाढ करण्यात आली असून सदर वाढ रद्द करण्याचा निर्णय दिनांक ५ मार्च, २०१६ रोजी मा.परिवहन मंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील दरवाढ रद्द करण्याच्या तसेच परमिट नुतणीकरण रक्कमेत बदल करण्याची अधिसुचना लवकरात लवकर निर्गमित करण्याचे आदेश मा. परिवहन राज्यमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत दिनांक २३ मे, २०१६ रोजी देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती सदर अधिसुचना निर्गमित करून परमिट दरात सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) : (१), (२), (३) व (४) राज्यातील विविध शुल्कामध्ये दिनांक १०.२.२०१६ च्या अधिसूचनेव्दारे वाढ करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १३.०७.२०१६ च्या अधिसूचनेव्दारे सदर शुल्क रचनेमध्ये सुधारणा करण्यात येऊन शुल्क कमी करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा चामोर्शी (जि.गडचिरोली) येथील संपादित ३.३५ हे. जमिनीपैकी २.३० हे.आर जागेचा ताबा राज्य परिवहन महामंडळास देणेबाबत

(१५) ६१८६३ (२४-०८-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी गडचिरोली यांनी दिनांक १३ एप्रिल, १९९९ ला मौजा चामोर्शी येथील सर्वे क्र.१२८६/१, १२८६/२, १२८६/३, १२८७, १२८८/१ क्रमांकाची ३.३५ हे.आर जागा मौजा चामोर्शी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानक व आगारासाठी घोषित केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूसंपादन अधिनियमानुसार त्या जागेपैकी १.०५ हे जागा वगळून २.३० हे आर जागेचा ताबा राज्य परिवहन महामंडळास बसस्थानक व आगाराच्या बांधकामासाठी देण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाने शासनाकडे वारंवार पाठपुरावा केलेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास राज्य परिवहन महामंडळाचे मध्यवर्ती कार्यालयाने २.३० हे.आर जागेचे जमीन अवार्ड नुसार मूल्य रु.३,२१,८९१/- उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी गडचिरोली यांचेकडे त्यांनीच दिलेल्या सूचनेनुसार दिनांक २९ एप्रिल, १९९९ ला जमा केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इतके वर्ष होवून देखील अजून पर्यंत त्या जागेचा ताबा राज्य परिवहन महामंडळास देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर जागा महामंडळास देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२६-०९-२०१७) : (१), (२) व (३) होय.
(४) व (५) राज्य परिवहन महामंडळाने ३.३५ हेक्टर जागेपैकी १.०५ हेक्टर जमीन भूसंपादन अधिनियम १९८४ चे कलम ४८ (१) अंतर्गत वगळून २.३० हेक्टर जागेचा ताबा घेण्याबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील रद्द व व्यपगत झालेल्या ऑटोरिक्षा परवान्यांचे नुतनीकरण करण्याबाबत

(१६) ६२६११ (२४-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रद्द व व्यपगत झालेल्या ऑटोरिक्षा परवानाच्या नुतनीकरणासंदर्भात माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने निर्णय घेऊन त्याकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांमार्फत आतापर्यंत ऑटोरिक्षाधारकांकडून परवाना नुतनीकरणासंदर्भात किती ऑटोरिक्षाचे परवाने नुतनीकरण करण्यात आले वा रद्द करण्यात आले आहे व त्याबाबतचा तपशिल काय आहे,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०६-०९-२०१७) : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) दि.१५.१२.२०१५ पर्यंत राज्यातील २९,६९९ परवाने नूतनीकरण करण्यात आले तसेच डिसेंबर, २०१५ मध्ये ४२,७९८ परवाने लॉटरी पध्दतीने पुनर्वाटपासाठी उपलब्ध करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वाहनधारकाला वाहन नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत

(१७) ६२८०८ (२४-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक वाहनधारकाला वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी परिवहन विभागाची आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या नागपूर शहर वगळता राज्यभरात कुठेच हे प्रमाणपत्र दिले जात नसून राज्यात ५ लाख वाहने या कागदपत्राविनाच रस्त्यावर चालविण्यात येत असल्याची गंभीर बाब दिनांक २२ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती ५ लाख वाहनांना नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) :(१) होय.
(२) हे खरे नाही. राज्यातील सर्व ५० परिवहन कार्यालयात वाहन नोंदणीनंतर नोंदणी प्रमाणपत्र वाहन मालकाच्या नावे जारी केले जाते.सद्य:स्थितीत कुठल्याही कार्यालयात नोंदणी प्रमाणपत्र छपाईकरिता प्रलंबित नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

एकदरा (ता.मुरूड, जि.रायगड) गावाजवळ मुरूड खाडीच्या मुखाशी ग्रोन्हयांस पद्धतीच्या बंधाऱ्याच्या कामाला मंजूरी मिळण्याबाबत

(१८) ६५६२६ (१०-०१-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकदरा (ता.मुरूड, जि.रायगड) गावाजवळ मुरूड खाडीच्या मुखाशी ग्रोन्हयांस पद्धतीच्या बंधाऱ्याच्या कामाला मंजूरी मिळावी व काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.राज्यमंत्री, बंदरे विकास यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भागात मच्छिमारांना आपल्या छोटया बोटी लावण्यासाठी बंदर नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत असल्याने महादेव कोळी समाज, नवापाडा (कोळीवाडा) शिवाजीनगर यांनी सन २०१२ पासून ग्रोन्हयांस पद्धतीच्या बंधारा बांधण्यासाठी पाठपुरावा करून सुद्धा संबंधित विभागाने दुर्लक्ष केले आहे, ही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मच्छिमारांना छोटया बोटी लावण्यासाठी ग्रोन्हयांस पद्धतीचा बंधारा बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (२२-०८-२०१७) :(१) एकदरा व मुरुड खाडीच्या मुखाशी ग्रोन्हयांस पध्दतीचा बंधारा बांधुन मिळणे याबाबत महादेव कोळी समाज नवापाडा (कोळीवाडा) मुरुड जंजिरा रायगड यांनी मा. मंत्री (पदुम) यांना दिनांक ०८.११.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे विनंती केली आहे.
(२) व (३) नीलक्रांती योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये एकदरा खाडीच्या मुखाशी ग्रोन्हयांस पध्दतीचा बंधारा बांधणे हे काम प्रस्तावित आहे. मच्छिमारांना छोटया बोटी लावण्यासाठी व मत्स्यव्यवसायाकरिता पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम एकदरा ता.मुरुड, जि.रायगड येथील नाबार्ड टप्पा-२० सन २०१४-१५ अंतर्गत चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वालंबन योजनेद्वारे आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवा पत्नींसाठी ऑटोरिक्षा परवाना वितरित करण्याबाबत

(१९) ६८२१३ (१६-१२-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवा पत्नीसाठी नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एक विशेष बाब म्हणून विधवा पत्नीच्या नावे ऑटोरिक्षा परवाना वितरित करण्यास हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वालंबन योजनेद्वारे माहे ऑगस्ट, २०१६ वा त्या दरम्यान निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अद्याप किती निराधारांना परवाना वाटप शासनाद्वारे करण्यात आले आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (११-०८-२०१७) : (१) व (२) दि.२१.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवासाठी नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणाच्या दृष्टीने एक विशेष बाब म्हणून विधवांच्या नावे ऑटोरिक्षा परवाना वितरित करण्यास हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) व (४) फेब्रुवारी २०१७ अखेर आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणा-या ६३२ आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवांना इरादापत्रे देण्यात आली आहेत.

महाराष्ट्र राज्यातील परिवहन विभागामार्फत वाहन नोंदणी पुनश्च कागदी स्वरुपात दिल्या जात असल्याबाबत

(२०) ६९६८५ (१६-१२-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील परिवहन विभागामार्फत २००३ मध्ये वाहन नोंदणी पुस्तिका स्मार्ट कार्यप्रणाली रद्द करुन वाहन नोंदणी पुनश्च कागदी स्वरुपात दिल्या जात असताना कागदांचा तुटवडा निर्माण झाला असल्याने डिजिटलायझेशनचा मुद्दाच गायब झाल्याचे वास्तव निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर कोणत्या तातडीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, सदर उपाययोजनांची सदयस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०६-०९-२०१७) : (१), (२), (३) व (४) राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये नोंद झालेल्या वाहनांना सन २००६ पासून स्मार्ट कार्ड स्वरुपातील नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येत होते. सेवापुरवठादारासोबतचा करार डिसेंबर २०१४ मध्ये संपुष्टात आला. नविन सेवा पुरवठादार निवड प्रक्रियेस न्यायालयीन प्रकरणामुळे विलंब झाला. न्यायालयाच्या आदेशानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून सेवा पुरवठादाराची निवड करण्यात आली आहे.

मुंबईत ओला-उबेर यांना शासनाने टुरिस्ट परमिट दिल्याबाबत

(२१) ६९७२० (१६-१२-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ओला-उबेर यांना शासनाने टुरिस्ट परमिट दिल्याप्रकरणी, काळी-पिवळी टॅक्सी तसेच मेरु, मेगा आणि टॅब कॅबस यांच्या 'असोसिएशन ऑफ रिडिओ टॅक्सीज' या संघटनेने, माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ओला-उबेर यांना शासनाने परस्पर टुरिस्ट परमिट दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, 'असोसिएशन ऑफ रिडिओ टॅक्सीज' या संघटनेने, शासनाकडे कोणत्या मागण्या केल्या आहेत, त्यापैकी किती मागण्या शासनाने मान्य केल्या आहेत,

(४) असल्यास, मुंबईतील जनतेस ॲप आधारीत, किफायतशीर आणि आरामदायक सेवा ओला-उबेर टॅक्सी यांचे मार्फत उपलब्ध करुन देणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री. दिवाकर रावते (१०-०८-२०१७) :(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) सदर संघटनेने निवेदनात पुढीलप्रमाणे प्रमुख मुद्दे मांडले आहेत.

१. सार्वजनिक प्रवासी वाहतूक बिल्ला नसलेल्या समुच्चयकाच्या ताफ्यातील वाहन चालकावर बंदी घालणे.

२. केवळ शुध्द इंधनावर चालणारी प्रवासी वाहने (कॅब्स) शहरामध्ये पॉईट टू पॉईट व्यवसाय करु शकतात याबाबत सर्व भागभाडवल धारकांना माहिती करुन दयावी.

३. मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ८८(९) अन्वये प्राप्त परवानाधारक शहरांतर्गत पॉईट टू पॉईट व्यवसाय करु शकत नाहीत.

४. सर्व समुच्चयकांनी मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ९३ अंतर्गत अनुज्ञप्ती प्राप्त करणे आवश्यक आहे.

५. सर्व समुच्चयक व त्यांच्या ताफ्यातील वाहन चालक जे मोटार वाहन कायदयातील तरतुदींचा भंग करतात त्यांच्यावर मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १९२(अ), १९३, १७७ व १९९ नुसार कारवाई करावी.

(४) ओला, उबेर सारख्या ॲग्रीगेटर टॅक्सीचे नियमन करण्यासाठी "महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७" विहीत करण्यात आले आहेत.

अकोला जिल्हयात महाबीजद्वारे हरभरा अनुदानित बियाणे वाटपात झालेला गैरव्यवहार

(२२) ७३९३७ (१९-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयाकरीता राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमधुन अनुदानावर महाबीज मंडळाकडुन पुरविण्यात आलेला हरभरा बियाणामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबतची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनानी शेतक-यांना महाबीज मंडळाकडुन हरभरा बियाणे खरेदी करतांना किलो मागे ३० रूपये अनुदान दिले असुन खुल्या बाजारात हरभरा ११० रूपये तर अनुदानीत बियाणे ८० रूपये पडत होते परंतु अनेक भागात बियाण्याचा मोठया प्रमाणात तुटवडा निर्माण झाल्यामुळे शेतक-यांना खुल्या बाजारात क्विंटल मागे ३ हजार रूपये अधिक देउन खरेदी करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील अनेक शेतक-यांची अशी तक्रार आहे की महाबीज महामंडळाच्या वरीष्ठ अधिका-यांद्वारे खरेदी करण्यात आलेल्या हरभरा बियाणामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्यामुळे हा तुटवडा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, अकोला कृषीअधिकरी, कृषीसहायक, तसेच मंडळ अधिकारी यांच्याकडुन वाटपाची यादी मागीतली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बियाणे घोटाळयामध्ये गुंतलेल्या वरीष्ठ अधिका-यांच्या कामाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय व त्याचे स्वरूप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०९-२०१७) :(१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

अकोला जिल्हयामध्ये हरभरा पिकाचे पिक प्रात्यक्षिके आणि बियाणे वितरणाकरिता एकूण १४९०८.३० क्विंटल बियाणे १६,१४३ लाभार्थी शेतकऱ्यांना महाबीजने त्यांच्या ३८८ विक्रेते व उप-विक्रेत्यांमार्फत अनुदानावर उपलब्ध करुन दिले होते. त्यावेळी खुल्या बाजारात धान्य म्हणून विकल्या जाणाऱ्या हरभऱ्यापेक्षा सदर अनुदानित बियाण्यांचे दर प्रति किलो १५ ते २० रुपयाने कमी होते.

अकोला जिल्हयातील ४ कृषि सेवा केंद्रांनी उगवा गावातील १४६ शेतकऱ्यांच्या नावाने जिल्हयास पुरविलेल्या अनुदानित बियाण्यांपैकी ७०५ बियाण्यांच्या बॅगांची परस्पर उचल करुन खुल्या बाजारात धान्य म्हणून विक्री केली असल्याचे कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद,

अकोला यांच्या चौकशीमध्ये निदर्शनास आलेले आहे. या बियाण्याच्या अनुदानाची अंदाजित रक्कम रु. ५.२९ लाख आहे.

या प्रकरणी ४ कृषि सेवा केंद्रांचा बियाणे विक्रीचा परवाना ६ महिन्यांसाठी निलंबित केलेला आहे तसेच, मे. दिपक कृषि सेवा केंद्र, अकोट स्टँड, अकोला यांचे महाबीजचे अधिकृत विक्रेते पद रद्द करण्यात आलेले आहे.

या कृषि सेवा केंद्रांनी बियाण्यांची धान्य म्हणून विक्री करुन बियाणे या संसाधनाची नासाडी केली आहे, त्यामुळे शासनाने पुरविलेल्या अनुदानित बियाण्यापासून काही शेतकरी वंचित राहिले आहेत. सदर बियाणे विक्रेत्यांनी महाबीजची व शासनाची फसवणूक केली असल्याने त्यांच्या विरुद्ध फौजदारी कारवाई करण्याबाबत महाबीजला निर्देश देण्यात आलेले आहेत. या गैरव्यवहारात महाबीजचा कोणताही अधिकारी / कर्मचारी गुंतल्याचे आढळलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सीमारेषेवर परिवहन विभागाच्या असणाऱ्या तपास चेकनाक्यांच्या आधुनिकीकरणाबाबत

(२३) ७४१६८ (१२-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सीमारेषेवर परिवहन विभागाच्या असणाऱ्या तपास चेकनाके हे संपूर्ण संगणकीकृत होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सीमारेषेवर असणाऱ्या तपास चेकनाक्यावरील होणाऱ्या मोठा भ्रष्टाचाराला रोख बसणार असून जवळपास ५०० कोटीचा रुपयांचा अधिक महसूल शासनाच्या तिजोरीत येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर चेकनाके हे शासन चालवणार आहे कि खाजगी कंपन्यांद्वारे चालविले जाणार आहेत व त्यासाठी शासनाला किती खर्च येणार आहे,

(४) सदर संपूर्ण संगणकीकृत तपास चेकनाके कधीपासून चालू होणार आहेत, याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) :(१), (२) व (३) सन २००८ मध्ये राज्यातील सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे वाहनांची तपासणी सुकर व सुरळीत होईल तसेच वाहन चालक/मालक यांना कमीत कमी वेळेत योग्य देय रकमेचा भरणा करणे शक्य होईल, हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

(४) राज्यातील २४ सीमा तपासणी नाक्यांपैकी १६ सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण पुर्ण झालेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ठाणे (जि.ठाणे) शहरात स्कूलबस नियमांचे उल्लंघन करणा-या बस चालकांवर कारवाई करण्याबाबत

(२४) ७४४७२ (१२-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे (जि.ठाणे) शहरामध्ये स्कूलबस नियमांचे उल्लंघन करुन विद्‌यार्थ्यांची ने-आण करणा-या ३० स्कूलबससह बेकायदा वाहतूक करणारी ८७ वाहने ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने जप्त केली असून त्यापैकी ५७ वाहनांची नोंदणी ४ महिन्यांसाठी रद्द करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्‌यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देणा-या नियमांचे उल्लंघन करुन अनेक स्कूलबस चालक-मालक नादुरुस्त बसेस, मारुती व्हॅन, महिंद्रा मॅक्स व टाटा मॅजिक या सारख्या वाहनांमधून परवानगी नसतांनाही विद्‌यार्थ्यांची ने-आण करतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती बेकायदा स्कूलबस व खाजगी वाहनांतून विद्‌यार्थ्यांची ने-आण करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०६-०९-२०१७) :(१) शालेय विद्‌यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कुल बसेसची व इतर वाहनाची प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांचे कार्यालयामार्फत माहे जानेवारी, २०१७ मध्ये तपासणी केली असता, सदर तपासणीमध्ये दोषी १०२ वाहनांवर कारवाई करून एकूण ९२ वाहने अटकावून ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकूण ४२ खाजगी वाहनांचे नोंदणी निलंबित करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) शालेय विद्‌यार्थ्यांची वाहतूकी करणाऱ्या वाहनांची तपासणी स्कुल बस धोरण, २०११ नुसार तपासणी करण्यात येते. त्यानुसार विद्‌यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या तसेच खाजगी वाहनातून शालेय विद्‌यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या मारूती व्हॅन, महिंद्रा मॅक्स व टाटा मॅजिक या सारख्या खाजगी संवर्गात नोंदणी झालेल्या १८ वाहनांवर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

परिवहन विभागातील अभ्यासक व तज्ज्ञनी मुंबईमधील रिक्षा व टॅक्सी यांच्या भाडे विषयी सुचविलेल्या सुचना

(२५) ७४४९० (१७-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये रिक्षा व टॅक्सी यांचे जादा भाडे हे १० किमी अंतरानंतर लागू करावे असे मत परिवहन विभागातील अभ्यासक व तज्ज्ञंनी व्यक्त केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईमध्ये लवकरात लवकर इलेक्ट्रोनिक रिक्षा व टॅक्सी चालू कराव्यात व जे रिक्षा व टॅक्सी चालक ग्राहकांची भाडे नाकारतील त्यांच्याही दंडामध्ये वाढ करावी असेही परिवहन विभागातील अभ्यासक व तज्ज्ञांकडून सुचविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील परिवहनाचा अभ्यास करण्यासाठी व तज्ञांनी सुचविलेल्या सूचनांचा विचार करण्यासाठी विशेष तज्ज्ञ समिती नेमली जाणार आहे काय,

(४) तसेच, परिवहन विभागातील अभ्यासक व तज्ज्ञांनी दिलेल्या सूचना अंमलात आणण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०९-०८-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शासनाने दिनांक १०.१०.२०१६ चे शासन निर्णयान्वये राज्यातील ऑटोरिक्षा/ टॅक्सींचे भाडेदर सूत्र विहित करण्याकरीता श्री. बी.सी.खटुआ, संचालक, मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट सुनिट यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती गठीत केली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खरीप व रब्बी सन २०१५ च्या हंगामातील दुष्काळबाधित शेतक-यांना मदत देण्याबाबत

(२६) ७४७३३ (१३-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खरीप व रब्बी सन २०१५ च्या हंगामातील दुष्काळबाधित तीस हजार गावांतील शेतक-यांना १७०० कोटी रुपये मदत देण्याचा निर्णय मा. मदत व पुनर्वसन मंत्री यांनी घेतला असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळबाधीत शेतक-यांना सदरील मदत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचा संपूर्ण तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) खरीप-२०१५ मध्ये नागपूर, अमरावती, नाशिक व औरंगाबाद विभागातील बाधीत झालेल्या शेतीपीकांकरिता एकूण रु.१२९६.१० कोटी तसेच रब्बी-२०१५ मध्ये अहमदनगर जिल्हयातील बाधीत पीकांकरीता एकूण रु.१३३.१३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण डोंबिवली येथील रिक्षाचालक मीटर सक्ती लागू असतांना मीटरविना भाडेवसुली करीत असल्याबाबत

(२७) ७४८१७ (१७-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली रिक्षाचालकांची वाढती मुजोरी आणि वाढती अवाजवी, भाडेवाढी रोखण्यासाठी मीटर सक्ती लागू करण्यात आली आहे परंतु मीटरविना भाडेवसुली सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात रिक्षाने ये-जा करण्यासाठी किमान भाडे २० रु. आकारण्यात येतात परंतु कल्याणमध्ये थेट कुठे जायचे असेल तर मीटरनुसार भाडे आकारणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने यावर कोणती उपाययोजना केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०६-०९-२०१७) : (१) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांनी केलेल्या तपासणीमध्ये मीटर प्रमाणे भाडे आकारणीस नकार देणे, जादा भाडे आकारणे, उद्धट वर्तन करणे अशा स्वरूपांच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत.
(२) व (३) तपासणीमध्ये दोषी सापडलेल्या वाहनांवर तडजोड शुल्क वसूली, न्यायालयीन दंड, परवाना निलंबन, अनुज्ञप्ती निलंबन अशा स्वरुपाची नियमितपणे कारवाई केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यु या स्टील कंपनीच्या प्रकल्प बाधित मच्छिमारांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबाबत.

(२८) ७५१७९ (२०-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवी (ता.पेण, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यु या स्टील कंपनीच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या पारंपारिक पद्धतीने मछिमारी करणाऱ्या कुटुंबीयांना व भात शेत जमिनीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई व इतर काही लेखी आश्वासन कंपनी व्यवस्थापनाने देऊन अनेक वर्षे होवून सुद्धा अद्यापही पूर्ण केले नसल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्प बाधित मछिमार व शेतक-यांना न्याय मिळवून देण्याकरीता स्थानिक संघटनेच्यावतीने दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास कंपनीच्या गेटसमोर ठिया आंदोलनही करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशिररित्या प्रकल्प उभारणाऱ्या कंपनीबाबत वारंवार आंदोलने व निवेदन देवून सुद्धा प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही अद्यापही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात कोणती चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, प्रकल्प बाधित मच्छिमारांना व शेतकऱ्यांना न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (१९-०८-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) शासन निर्णय क्र. मत्स्यवि-१११३/प्र.क्र. ३०७/पदुम-१४, दिनांक २४.२.२०१६ अन्वये धरमतर खाडीमध्ये ०२ कंपन्यांची जेट्टी बांधकामामुळे मत्स्योत्पादनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी डॉ. चंद्रप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील दुष्काळग्रस्तांसाठी केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने दिलेल्या निधीबाबत

(२९) ७७४५७ (१३-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अनिल कदम (निफाड), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील दुष्काळग्रस्तांसाठी केंद्र शासनाने दिलेला आणि राज्य शासनाने दिलेला सुमारे २३०० कोटी रुपयांचा निधी माहे ऑक्टोंबर/नोव्हेंबर, २०१६ पासून अखर्चित राहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,मंजूर झालेल्या निधीचा विहीत मुदतीत विनियोग करण्याबाबत शासनाचे आदेश, निर्देश, सूचना असतांना ह्या आदेशांचा, निदेशांचा, सूचनांचा उल्लंघन करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावंडी (अहमदनगर) येथील नगर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची इमारत धोकादायक असल्याबाबत

(३०) ७७४७६ (१४-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंडी (जि.अहमदनगर) येथील नगर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची इमारतीचे १० वर्षापूर्वी बांधलेले काम निकृष्ठ दर्जाचे केल्याने इमारत धोकादायक बनली असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने येथील अहवाल दिला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीचे निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व नगर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची नवीन ईमारत बांधण्याविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०९-२०१७) :(१) हे खरे नाही. तालुका कृषी अधिकारी, अहमदनगर कार्यालयाची इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, नाशिक यांनी सन २००६-०७ मध्ये करुन दि.१.१२.२००७ पासून इमारतीचा ताबा कृषी विभागाकडे दिलेला आहे. जानेवारी, २०१६ मध्ये उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर कार्यालयाचे दोन प्रतिनिधी व तालुका कृषी अधिकारी, अहमदनगर यांनी इमारतीची संयुक्त पाहणी केली असता इमारतीच्या भिंतींना तडे गेल्याचे दिसून आलेले आहे. उपविभागीय कृषी अधिकारी, अहमदनगर यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडे इमारत धोकादायक बनली असल्याचे प्रमाणपत्र व बांधकाम दुरुस्तीचे अंदाजपत्रक देण्याबाबत

विनंती केली असता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी दि.२३.०६.२०१७ रोजी इमारतीची समक्ष पाहणी करुन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणेबाबत तोंडी सूचना दिलेल्या आहेत.

(२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी सूचित केल्यानुसार इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल व नगर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीबाबत निर्णय घेतला जाईल. दरम्यान पूर्वदक्षता म्हणून तालुका कृषी अधिकारी, अहमदनगर यांनी माहे, एप्रिल, २०१७ सदर इमारतीत कामकाज करणाऱ्या सर्व शाखांमधील अधिकारी/कर्मचारी यांना शेजारील ग्रंथालयाच्या इमारतीत टेबल, खुर्च्या, कपाटे व अभिलेखांसह हलविणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

निमगाव केतकी (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील कृषीसेवा केंद्राचा बी-बीयाणे विक्रीचा परवाना रद्द करण्याबाबत

(३१) ७७७७४ (१४-०४-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव केतकी (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील कृषीसेवा केंद्राचा बी-बीयाणे विक्रीचा परवाना वैधता मुदत संपलेले बीयाणे शेतकऱ्यास विकल्या प्रकरणी जिल्हा कृषी विकास अधिकारी जिल्हा परीषद, पुणे यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मका बियाणाच्या विक्री किंमतीपेक्षा जास्त किंमत सदर दुकानदाराने (कृषी सेवा केंद्राने) आकारली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुकानाचा परवाना रद्द करण्याचा आदेश देण्यात आला असला तरी मक्याच्या लागवडीतील नुकसान भरपाई ची किंमंत संबंधीत शेतकऱ्यांस देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०८-२०१७) :(१) होय, दिनांक २७ डिसेंबर, २०१६ पासून सदर कृषि सेवा केंद्राचा बी-बियाणे विक्रीचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेला आहे.

(२) नाही.

(३) व (४) मे.कृषि सेवा केंद्र, नवी पेठ, निमगाव केतकी, ता.इंदापूर, जि.पुणे या बियाणे विक्री केंद्रातून वैधता संपलेल्या मका बियाणाची विक्री करण्यात आली होती. श्री.सुनिल रघुनाथ बाशिंगे, रा.पिटकेश्वर, ता.इंदापूर, जिल्हा पुणे या शेतकऱ्याच्या तक्रारीनुसार तालुका तक्रार निवारण समितीने प्रत्यक्ष मका पेरलेल्या क्षेत्राची पाहणी केली असता वैधता संपलेल्या बियाणांमुळे मका बियाणाची उगवण कमी असल्याचा निष्कर्ष समितीने काढला. सदर

समितीच्या अहवालानुसार मे.कृषि सेवा केंद्र, नवी पेठ, निमगाव केतकी, ता.इंदापूर, जि.पुणे या बियाणे विक्री केंद्राचा बियाणे विक्रीचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेला आहे तसेच संबंधित शेतकऱ्यास कृषि सेवा केंद्राकडून रूपये २१,०००/- इतकी नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरात व मुल (जि.चंद्रपूर) येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापण्याच्या प्रस्तावाबाबत

(३२) ७७९७२ (१४-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर धुळे शहरात आणि अकोल्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर मूल (जि.चंद्रपूर) येथे नवीन कृषी विद्यापीठ स्थापण्याचा प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन कृषी विद्यापीठांसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर विद्यापिठ स्थापण्यासंदर्भात शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०८-२०१७) :(१) नाही.

तथापि कृषि विद्यापीठे विभाजनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत विद्यापीठे विभाजनास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने MCAER कडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

केळीला वाणिज्य (कॉमर्स) विभागातून फळाचा दर्जा मिळणे बाबत

(३३) ७८१५७ (१२-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळीला फळाचा दर्जा कृषी विभागात आहे मात्र वाणिज्य (कॉमर्स) विभागातून केळीला फळाचा दर्जा नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील केळीच्या टाकावू खोडापासून टिकाऊ वस्तू कशी बनेल व शेतकऱ्यांना उत्पादनांवर आधारित भाव कसा मिळेल या करिता शासन काही प्रयत्न करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ड्रायकेळी विद्यार्थ्यांना देण्याबाबत व केळीच्या खोडापासून धागा तयार करून त्यातील पाणी हे फवारणी व सेंद्रिय शेतीसाठी उत्कृष्ट असल्याबाबत शासनाच्या कृषी विभागाकडून संशोधन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास ,यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०७-०९-२०१७) :(१) केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयांतर्गत, "अपेडा" या प्राधिकरणाने केळीस फळ म्हणून घोषित केलेले आहे.
(२), (३), व (४) मे.ताप्ती व्हॅली बनाना प्रोसेसिंग अँड प्रोडक्टस को.ऑपरेटिव्ह सोसायटी लि, फैजपूर, ता.यावल, जि.जळगाव या संस्थेने, सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर सादर केलेल्या, केळी पिकाच्या खोडावर प्रक्रिया करून इतर उपउत्पादने निर्मिती करण्याच्या प्रकल्पास, राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पातंर्गत, केळीच्या खोडावर प्रक्रिया करून त्यापासून धागा निर्मिती व सेंद्रीय द्रव्यरूप खत तयार करण्यात येत आहे. तसेच मे.ताप्ती व्हॅली बनाना प्रोसेसिंग अँड प्रोडक्टस को.ऑपरेटिव्ह सोसायटी लि. व महात्मा फुले कृषि विद्यापिठ राहूरी अंतर्गत, केळी संशोधन केंद्र, जळगाव, यांच्यामार्फत संयुक्तपणे पथदर्शी प्रकल्पांतर्गत संशोधनाचे कार्य प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील मौदा, रामटेक, पारशिवनी आणि इतर तालुक्यातील कृषी विभागाकडून शेतक-यांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याबाबत

(३४) ७८२२५ (१४-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील मौदा, रामटेक, पारशिवनी आणि इतर तालुक्यातील कृषी विभागाकडून शेतक-यांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने शेतक-यांचे उत्पादन कमी झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागाकडून शेतक-यांच्या भेटीगाठी घेऊन मार्गदर्शन करावे आदि कामे अपू-या कर्मचा-यांमुळे घेता येत नाहीत, हे ही खरे काय,
(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०९-२०१७) :(१) हे खरे नाही. माहे जानेवारी २०१७ मध्ये नागपूर जिल्ह्यातील मौदा, रामटेक आणि पारशिवणी आणि इतर तालुक्यात शेतकऱ्यांची उत्पादने

कमी झाल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही. याउलट नागपूर जिल्ह्यात सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये पिंकांच्या उत्पादकतेत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, उप विभागातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन प्रक्रियेपासून ते पीक कापणी पर्यंतचे मार्गदर्शन, किड व रोगांपासून होणारे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(२) अशंत खरे आहे. रामटेक उपविभागातील रामटेक, पाशिवणी, मौदा या तालुक्यात सद्यस्थितीत एकूण १९० पदे मंजूर असून त्यापैकी १०२ पदे भरलेली आहेत व ८८ पदे रिक्त आहेत. तथापि, पर्यायी कर्मचाऱ्यांमार्फत कामे करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

देवरी व सालेकसा (जि.गोंदिया) या आदिवासी तालुक्यांची परस बागेत पौष्टीक भाजीपाला व फळांच्या लागवडी या योजनेसाठी निवड करण्याबाबत

(३५) ७९०९८ (१४-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३ आदिवासी जिह्यात तालुक्याच्या पातळीवरच्या आदिवासींच्या कुटुंबियांना परस बागेत पौष्टीक भाजीपाला व फळांच्या लागवडीची निवड या योजनेनुसार गोंदिया जिह्यातील देवरी व सालेकसा या तालुक्यांमधील आदिवासींचा समावेश करून फुले, फळे व भाजीपाला यांच्या लागवडीस मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित कृषि विभागाकडे लेखी निवेदन दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतून परस बागेत पौष्टीक भाजीपाला व फळांच्या लागवडीसाठी देवरी व सालेकसा या आदिवासी तालुक्याची निवड करण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०८-२०१७) :(१) होय.

(२) "आदिवासी कुटुंबांच्या परसबागेत भाजीपाला व फळझाड लागवड" ही योजना सन २०१७-१८ मध्ये, गोंदिया जिल्हयातील देवरी व सालेकसा या तालुक्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कापूस उत्पादक शेतक-यांना प्राप्त झालेल्या नुकसान भरपाई निधीच्या वाटपाचे नियोजन करण्याबाबत

(३६) ७९४५९ (१९-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर तालुक्यातील (जि.औरंगाबाद) अपु-या पावसामुळे दुष्काळाच्या झळा सोसलेल्या कापूस उत्पादक शेतक-यांना अखेर दीड वर्षाच्या प्रतिक्षेनंतर कापूस पीक नुकसानीपोटी शासनाने २४ कोटी ७७ लाख ६१ हजार रुपयांची नुकसान भरपाई निधी दिला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका नैसर्गिक आपत्ती विभागाकडे मात्र कापसाचा विमा उतरविलेल्या व विमा न काढलेल्या शेतक-यांची आकडेवारी उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे नुकसान भरपाई रक्कम वाटपासाठी शासनाने कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) तलाठी कार्यालयांमार्फत पीक विमा उतरविलेल्या लाभार्थ्यांची नांवे वगळून त्याप्रमाणे पात्र लाभार्थ्यांच्या याद्या तयार करुन, त्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्हयात अनेक शेतक-यांनी पिक विमा भरलेला असतानाही त्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबत

(३७) ७९४८९ (०९-०५-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यासह औरंगाबाद जिल्हयात अनेक शेतक-यांनी पिक विमा भरलेला असतानाही त्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार शेतक-यांना त्यांच्या पिक विम्यानुसार नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०८-२०१७) :(१) खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. औरंगाबाद जिल्हयातील ७.८८ लाख शेतकऱ्यांनी योजनेत

सहभाग घेऊन ३.७५ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले होते. सहभागी शेतकऱ्यांपैकी ७१६६३ शेतकऱ्यांना रुपये १०.६८ कोटी नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली आहे.

सिल्लोड तालुक्यातील १.४१ लाख शेतकऱ्यांनी ५६९९६ हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले होते त्यापैकी ११८६१ शेतकऱ्यांना रु. ७३.६४ लाख नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधीत बँकाकडे वर्ग करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयात गतवर्षी पीक विमा काढलेल्या शेतक-यांना
पीक विम्याचा लाभ नाकारण्यात आल्याबाबत

(३८) ७९८५३ (०९-०५-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात गतवर्षी पीक विमा काढलेल्या २१ हजार ५०३ शेतक-यांपैकी १९० शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ नाकारण्यात आला असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतक-यांकडून १० कोटी ७६ लाख रुपयांचा विमा हप्ता जमा करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यावर्षीचा खरीप हंगामातील पीक विम्याचा लाभ अदयाप मिळालेला नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर करवाई करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०८-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०१५ मध्ये चंद्रपूर जिल्हयातील ५७ हजार शेतकऱ्यांनी ७० हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले होते. शेतकऱ्यांकडून रू.३.९४ कोटी विमा हप्ता जमा करण्यात आला होता व २२ हजार शेतकऱ्यांना १०.७६ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत वितरीत करण्यात आली आहे.

(३) प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०१६ मध्ये चंद्रपूर जिल्हयामध्ये रिलायन्स जनरल इंशुरन्स कंपनी मार्फत राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील ९८,६५२ शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन १.३७ लाख हेक्टर क्षेत्रास विमा संरक्षण घेतले होते. त्यापैकी योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ५८२ शेतकऱ्यांना रु. ४४.२७ लाख नुकसान भरपाई वितरीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या राजूरा आगारामध्ये (जि.चंद्रपूर) कार्यरत चालकांच्या आमरण उपोषणाबाबत

(३९) ८००२० (१७-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या राजूरा आगारामध्ये (जि.चंद्रपूर) कार्यरत चालकांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आमरण उपोषण सुरू केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपोषणकर्त्यांच्या मागण्यांचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२२-०८-२०१७) :(१) होय.

(२) सन २०१२ चा वेतन करार हा महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर एस.टी. महामंडळातील कर्मचाऱ्यांना लागू करावा, चालक व वाहक यांच्या कामगिरीची वेळ ८ तास असावी, जास्तीची कामगिरी केल्यास त्यानंतर अतिकालिक भत्ता देण्यात यावा, नाईट हॉल्ट करणाऱ्या चालक व वाहकांना ८+८+४=२० तास, २ दिवसांची हजेरी व ४ तासांचा अतिकालिक भत्ता द्यावा, सुट्टीच्या दिवशी कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या तारखेचा दुप्पट पगार आणि भरपाई सुट्टी देण्यात यावी, अपघाती कर्मचाऱ्याला औषधोपचार खर्च, कुटुंबासाठी औषधोपचार खर्च आणि कर्मचाऱ्याचा अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या परिवाराला रु.१० लाखाची मदत व त्याच्या परिवारातील सदस्याला नोकरी देण्यात यावी.

(३) उपोषण नोटीसमध्ये नमूद केलेल्या मागण्या ह्या धोरणात्मक स्वरुपाच्या आहेत. तसेच अमान्यताप्राप्त संघटना अथवा संघटना विरहीत व नेतृत्व नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या गटाबरोबर धोरणात्मक बाबींवर चर्चा होऊ शकत नाही. कामगार करार केवळ मान्यताप्राप्त संघटनेबरोबर केला जातो. महामंडळाची स्थापना झाल्यापासून (जून-१९५०) कर्मचाऱ्यांना कामगार कराराद्वारे वेतन व भत्ते दिले जात आहेत. सन २०१२ ते २०१६ या कालावधीतील कामगार कराराची मुदत संपली असून, पुढील करारासाठी मान्यताप्राप्त संघटनेने मागण्या सादर केल्या असून, महामंडळस्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांसाठी परिवहन विभागाच्या माध्यमातून फिरते शिबीर, मोबाईल कॅम्प आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव

(४०) ८०५३७ (१७-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तलासरी, जव्हार, विक्रमगड, वाडा आणि मोखाडा या पाच आदिवासीबहुल तालुक्यांसाठी परिवहन विभागाच्या माध्यमातून फिरते शिबीर, मोबाईल कॅम्प आयोजित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (१०-०८-२०१७) :(१) व (२) सदर ठिकाणी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई यांच्याकडून नियमितपणे शिबीरांचे आयोजन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम येथे पंजाबराव कृषी विद्यापीठ अंतर्गत नवीन शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

(४१) ८१६१४ (१४-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथे पंजाबराव कृषी विद्यापीठ अंतर्गत नवीन शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी एका निवेदन मार्फत मा.कृषी मंत्री यांच्याकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने वाशिम येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०८-२०१७) :(१) नाही.

तथापि मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

(२) राज्यात कृषि शिक्षणाचा बृहद आराखडा तयार करण्याचे काम MCAER स्तरावर चालू आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या बांधकामाबाबत.

(४२) ८१७०७ (१४-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय, धामणगाव रेल्वे येथील ईमारत बांधकामाकरिता जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ चे आदेशानुसार तहसील कार्यालय धामणगाव रेल्वे या इमारतीवरील दुसरा माळ्यावर बांधाकामाकरिता २१८९ चौ. फुट जागा मंजुर केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय इमारत बांधकामाचा अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करुन शासनांस निधीची मागणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांना दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुका कृषी अधिकारी कार्यालय इमारतीच्या बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०९-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, प्रशासकिय कामकाजाच्या दृष्टीने व जनतेच्या सुविधेसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालय इमारत बांधकामाची नितांत आवश्यकता आहे. त्यानुसार तालुका कृषि अधिकारी कार्यालय इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक प्राप्त करुन परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करुन निधी मागणी करण्यात यावी, असे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांना दि.१५.११.२०१६ रोजी कळविलेले आहे.

(३) या संदर्भात उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, धामणगाव रेल्वे यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालय बांधकामाचे प्राथमिक अंदाजपत्रक रू. ५६,०७,३८०/- तयार करून प्रशासकीय मान्यतेकरिता कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे सादर केलेले आहे. याबाबत तालुका कृषि अधिकारी, धामणगांव रेल्वे कार्यालयामार्फत उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धामणगांव रेल्वे यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक मागविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे आणि सविस्तर अंदाजपत्रकास मान्यता मिळताच पुढील अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळखुटी (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वरील पिंपळखुटी आर.टि.ओ. चेक पोस्टवर चालू असलेली अवैध वसुली व अवैध वाहतुक बंद करण्याबाबत

(४३) ८१७७२ (१३-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटी (ता.केळापुर, जि.यवतमाळ) येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ पिंपळखुटी प्रादेशिक परीवहन कार्यालयाच्या (आर.टी.ओ.) चेक पोस्टवरुन जाणा-या ट्रक चालकांकडुन दैनंदिनी नोंदणीच्या नावावर अवैध वसूली केली जाते तसेच, सदर चेक पोस्ट वरुन जनावरांच्या तस्करीचे वाहन सोडल्याबाबतच्या अनेक तक्रारी असुनही आर.टी.ओ. कार्यालयाचे या चेक पोस्टवर दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळखुटी आर.टी.ओ. चेक पोस्टवर सदर विभागाचे कर्मचारी व रोजंदारी कर्मचारी यांची नियुक्ती केली जात असुन मागील चार पाच महिन्यापासुन अधिकारी-यांमध्ये आर.टी.ओ. कार्यालयाचे दोन कर्मचारी सतत कर्तव्यावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकिय नियमानुसार आर.टी.ओ. चेक पोस्टवर एक अधिकारी आठ तास डयुटी करु शकतो परंतु वरिठ अधिका-याच्या खास मर्जितील असलेले सदरहू कर्मचा-यांना आर.टी.ओ. चेक पोस्टवर सततची डयुटी देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी करून तदनुसार सदरहु चेकपोस्टवर चालवलेली अवैध वसुली व अवैध वाहतुक बंद करण्यासाठी संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०८-०९-२०१७) :(१) अंशत: खरे आहे. सदरची बाब दि. ०१.०२.२०१७ रोजीच्या दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली आहे. परंतु सीमा तपासणी नाका पिंपळखुटी या नाक्यावरुन अवैध वसूली करणे व जनावरांची तस्करी करणारी वाहने सोडण्यात येण्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) हे खरे नाही. पिंपळखुटी आर.टी.ओ. चेक पोस्टवर दरमहा विविध कार्यालयामधून आळीपाळीने एकूण ८ मोटार वाहन निरीक्षक यांच्या नियुक्त्या केल्या जातात व दरमहा त्यांच्या नियुक्त्या बदलतात. तसेच अधिकाऱ्यास ८ तास ड्युटी करणे अभिप्रत असले तरी, कामाचा व्याप व अपुरे मनुष्यबळ या कारणाने अपवादात्मक परिस्थितीत काहीवेळा ८ तासापेक्षा जास्त ड्युटी केली जाते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात जप्त केलेली वाहने संबंधित वाहनचालकास परत न केल्याबाबत

(४४) ८२५७० (१३-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात एम.१०९८ या अटीचा भंग व अवैध प्रवासी वाहतुक केल्याप्रकरणी निलंबित केलेल्या अनेक वाहनांचा निलंबन कालावधी संपूनही जप्त केलेली सदरची वाहने संबंधित वाहनचालकास अद्यापपर्यंत परत करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनमालकांना त्यांची वाहने तात्काळ परत देण्यात यावीत अशी मागणी उस्मानाबाद जिह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद यांना निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने वाहनमालकांना त्यांची वाहने देण्याबाबत व सदरहू वाहने देण्यास विलंब करणा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०७-०८-२०१७) : (१) हे खरे नाही.स्थानबध्द झालेली व निलंबन कालावधी संपलेली वाहने मुक्त करून वाहनमालकाच्या ताब्यात नियमितपणे दिली जातात.

(२) स्थानिक लोकप्रतिनीधींनी १४.१०.२०१६ रोजी जप्त केलेली एक आटोरिक्षा सोडण्याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद यांना निवेदन दिले होते.

(३) चोरटी वाहतुक करताना दि.२०.७.२०१६ रोजी स्थानबद्ध केलेल्या वाहनाच्या मालकाने दि. २४.१०.२०१६ रोजी रु.८०,००० चे बंधपत्र सादर केल्यानंतर सदर वाहन दि. २५.१०.२०१६ रोजी वाहनमालकाच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील रब्बी हंगाम २०१५-१६ मधील बाधीत शेतक-यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४५) ८२६९८ (१९-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये एकूण १ हजार १४४ गावांपैकी ५० पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या उत्त्तर सोलापूर तालुक्यातील ४६, दक्षिण सोलापूरातील ७४, बार्शीतील १३८, उक्कलकोटमधील ११८, मोहोळमधील १०४, माढ्यातील ११३, करमाळ्यातील ८८, पंढरपूरातील ९५, सांगोल्यातील १०३, माळशिरसमधील ७८ आणि मंगळवेढ्यातील ८१ अशा एकुण १०३८ गावातील ९,०३,१८५ शेतकरी बाधीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाधीत शेतक-यांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी ८६८,०८,११,९०४ रुपयांचे अनुदान मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्ताकडे माहे डिसेंबर, २०१६ च्या तिस-या आठवड्यात पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदरहू बाधित शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१७) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) रब्बी हंगाम २०१५ मध्ये बाधित शेतक-यांना अनुदान वितरीत करणेसाठी आवश्यक अनुदानाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त,पुणे यांच्याकडून शासनास सादर करण्यात आलेला आहे. अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील कृषी कार्यालयात अनेक पदे रिक्त असल्याबाबत

(४६) ८३२२३ (१४-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील कृषी कार्यालयात अनेक पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकूर प्रमाणेच लातूर जिल्हयातील अन्य तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कृषी विभागातील पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांना विविध कामांसाठी अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चाकूर प्रमाणेच लातूर जिल्हयातील कृषी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०९-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे.

तालुका कृषि अधिकारी कार्यालय चाकूर व अधिनस्त कार्यालयामध्ये ५० मंजूर पदापैकी ३७ पदे भरलेली असून १३ पदे रिक्त आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी लातूर व अधिनस्त कार्यालयामध्ये ६५८ पदे मंजूर असून ५३१ भरलेली व १२७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकारी/ कर्मचारी यांना देवून शेतकऱ्यांच्या अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेण्यात आली आहे.
(३) कृषि संचालक, गट-अ संवर्गातील ४ रिक्त पदे दिनांक ०५/०६/२०१७ च्या आदेशान्वये भरण्यात आलेली आहेत. कृषि सहसंचालक, गट-अ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यावर आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील ५० उमेदवारांची निवडयादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेली असून त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच आणखी ७९ रिक्त पदांचे मागणीपत्र दिनांक ३०/०३/२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे.

तसेच या संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील १०२ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यावर आहे.

क्षेत्रिय स्तरावरील कृषि सहाय्यक संवर्गाची पदे भरण्यासाठी ७३० पदे विज्ञापित करण्यात आली होती. तथापि सदर पदासाठीची निवडयादी रद्द करण्यात आली आहे. यामुळे सदर पदे

भारांकन पध्दतीने भरण्याबाबत शासन निर्णय, दिनांक १७/०३/२०१७ नुसार कार्यवाही कार्यान्वित होती. तथापि, सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने ती भरता आलेली नाहीत. शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०१५ व दिनांक १५/०१/२०१६ नुसार या संवर्गातील आदिवासी क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील पदे भरण्याबाबतही विभागीय कृषि सहसंचालक यांना दिनांक १२/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

गट-क मधील रिक्त पदे भरणेबाबत शासन पत्र दिनांक २८/१०/२०१६ मधील निदेशानुसार लिपिक वर्गीय पदे नियमातील तरतुदीनुसार जाहिरात विज्ञापित करुन त्रयस्थ यंत्रणेमार्फत भरणेबाबत सर्व विभागीय कृषि सहसंचालक यांना दिनांक ०८/१२/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चांदूरबाजार (जि.अमरावती) येथे चांदूरबाजार अमरावती मार्गावरील शिराळा देवरी व नांदगाव पेठ येथे एस.टी. बसच्या नवीन दोन फे-या वाढविण्याबाबत

(४७) ८३८६४ (१३-०४-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) येथे चांदूरबाजार अमरावती मार्गावरील शिराळा देवरी व नांदगाव पेठ येथे एस.टी. बसच्या आणखी नवीन दोन फे-या वाढविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अमरावती यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मार्गावर एस.टी. बसच्या नवीन दोन फे-या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. दिवाकर रावते (२२-०८-२०१७) :(१) होय.

(२) लोकप्रतिनीधी यांचे मागणीनुसार १७.३० वाजताची फेरी अमरावती मार्गे शिराळा, देवरी नांदगाव पेठ मार्गे सुरु करण्यात आली आहे. सदरहू फेरीचे भारमान अत्यल्प असल्याने फेरी चालू ठेवण्याबाबत पुनर्विचार केला जाणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील गैरप्रकाराबाबत

(४८) ८४६५१ (१५-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक कार्यालय यवतमाळ येथील अधिकारी जाणीव पुर्वक वेळेवर वाहनाचे प्रमानपत्र न देणे, जास्त पैशाची मागणी करणे, एक-दोन महिने प्रकरण प्रलंबीत ठेवणे, प्रकरणे त्रुटीत

नसतांना अडवणुक करणे असे गैरप्रकार करीत असल्याचे दिनांक ३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रक मालक श्री.हाजी अहेमद यांनी त्यांच्या ट्रक चे फिटनेस प्रमाणपत्र १६ जानेवारी पासीगं करुन घेतले त्यावेळेला वाहन निरीक्षकांला कोणत्याही त्रुटया आढळुन आल्या नाहीत, परंतु संबंधीत विभागाच्या अधिका-याने एक महिना होऊनही जाणिवपूर्वक प्रमाणपत्रावर सही केली नाही त्यामुळे व्यावसायीकाचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डब्बल पायडल म्हणुन ओळखल्या जाणारा एक अधिकारी याच्या माध्यमातुन अनैक गैरप्रकार कार्यालयात चालत असतात त्याचा सामान्य नागरीकांना त्रास होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने सबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (०४-०९-२०१७) :(१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

ट्रक मालक श्री. हाजी अहेमद यांनी त्यांचे ट्रकचे योग्यता प्रमाणपत्राच्या नुतणीकरणासाठी दि.१७.०१.२०१७ रोजी वाहन सादर केले असता मोटार वाहन निरीक्षक यांनी वाहन तपासले. तपासणी अंती ट्रक यांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याने त्याच दिवशी सदर ट्रकचा कार्यालयीन अभिलेख (फिटनेस कार्ड) तयार केले होते. ट्रकचे कागदपत्राची तपासणी केली असता पर्यावरण कर न भरल्याने तशा सूचना ट्रक मालक यांना देण्यात आल्या व योग्यता प्रमाणपत्र प्रलंबित ठेवण्यात आले. ट्रक मालक यांनी दि.०१.०२.२०१७ रोजी पर्यावरण कर भरल्यानंतर दि.१३.०२.२०१७ रोजी "योग्यता प्रमाणपत्र" देण्यात आले. वाहन मालकाने कागदपत्रांमध्ये असलेल्या त्रुट्यांची पुर्तता करण्यास बराच कालावधी लावल्यामुळे योग्यता प्रमाणपत्र प्रलंबीत राहिले.त्यामुळे व्यावसायीकाचे नुकसान झाले, ही बाब खरी नाही.

(३) हे खरे नाही.

(४) होय.

(५) व (६) सदर प्रकरणात प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांनी सखोल चौकशी करुन याबाबत दोषी आढळलेल्या संबंधित अधिकाऱ्यास समज देण्यात आली आहे व तशी नोंद सेवापुस्तिकेत व वैयक्तिक नस्तीमध्ये घेतली आहे.

लातुर जिल्हयातील दुष्काळग्रस्त भागाकरीता उपलब्ध असलेल्या निधीचे वितरण करणेबाबत

(४९) ८४६७५ (१९-०४-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर जिल्हयासाठी खरीप हंगाम सन २०१४ वर्षातील दुष्काळामुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी एकूण रुपये २१८ कोटी निधी देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती शेतकऱ्यांना निधीचे वाटप करण्यात आले आहे,
(३) तसेच, उर्वरीत शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) खरीप २०१४ मध्ये दुष्काळामुळे बाधित झालेल्या एकूण ४२८१७८ शेतक-यांना रु.२१३.२५ कोटी निधी त्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दूध उत्पादक शेतक-यांना दूधाच्या दरात प्रतिलिटर तीन रूपये वाढ करणेबाबत

(५०) ९१७२५ (१४-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकरी संपानंतर शेतक-यांचा कर्जमाफीचा मार्ग मोकळा होण्यासाठी राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही दूधाच्या खरेदी दरात प्रतिलिटर तीन रूपयांची वाढ करण्याचे शासनाने माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घोषित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (०७-०९-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) शासनाने दि.१९ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये दूधाच्या खरेदी दरात प्रतिलिटर तीन रुपयांनी वाढ केली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे, दिनांक २१ जून,२०१७ पासून गाय दूधाची खरेदी रु.२४.००/- वरुन रु.२७.००/- तसेच म्हैस दूध खरेदी रु.३३.००/- वरुन रु.३६.००/- याप्रमाणे करण्यात आली आहे.

तथापि ग्राहकांसाठीचे दूध विक्री दर पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.